# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.


दिनांक 02/06/2020 (मंगळवार)
(दुपार)

### खून

1) पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 13 कि. मी अंतरावर सावनेर ते पाटणसावंगी येथे दिनांक 01/06/2020 चे 22.00 वा. दरम्यान जी.जे–12/बी.टी–3206 क्रमांकाचा ट्रकचा चालक– उदयनारायण मनोहर यादव (मृतक), वय 36 वर्ष, रा. नगरीया डहानपुर (युपी) व त्याचा क्लीनर आरोपी नामे– छोटु शिवनाथ प्रजापती, वय 20 वर्ष, रा. नगरीया जाहानपिर, आजमगढ (युपी) यांचे जेवनाचे कारणावरून ट्रकचे कॅबिन मध्ये भांडण झाले. यादरम्यान आरोपीने गाडीचे कॅबिन मध्ये ठेवलेल्या लोंखडी पाण्याने उदयनारायण यादव याचे डोक्यावर वार करून त्यास गाडीचे खाली ढकलुन जिवानिशि ठार केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सौ. रेखा पृथ्वीराज कश्यप, वय 30 वर्ष, रा. ह.मु.पाटणसावंगी मुळ पत्ता– बांधा.जिल्हा बांधा,(युपी) यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 302 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास स.पो.नि. श्री फुलेकर 7588564300 हे करीत आहे.

2) पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 4 कि. मी अंतरावर इंडीयन बॅक, जे एन हॉस्पीटल कांद्री कन्हान येथे दिनांक 01/06/2020 चे 22.30 वा. ते 23.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– अक्रमखान छोटेखान, वय 30 वर्ष, रा. मातोश्री लॉन, जे एन हॉस्पीटल कांद्री, कन्हान ता. पारशिवणी जिल्हा नागपूर व राजु उर्फ शिवशंकर शितलप्रसाद कश्यप (मृतक), वय 32 वर्ष, रा. जे एन हॉस्पीटल कांद्री कन्हान हे दोघेही त्यांचे कंपनीतुन शिप्ट संपल्यावर घरी जात होते. यादरम्यान आरोपी क्रमांक 1) बिरेन जगतपाल चव्हाण, 2) रगबेन जगतपाल चव्हाण, 3) सुरज चव्हाण, 4) विरेंद्र नायक व त्यांचे सोबत असलेल्या 2 ते 3 लोकांनी बेकायदेशीर मंडळी गोळा करून मृतकाचे मोटारसायकल अडवुन आरोपी क्र 3 व 4 यांनी मृतकाला पकडुन ठेवले व आरोपी क्र 1 व 2 यांनी मृतकाला जिवाने ठार मारण्याचे उदेशाने तलवार व चाकुने त्याचेवर वार करुन त्याला जिवानीशी ठार केले. तसेच फिर्यादी हे मृतकला वाचविण्यासाठी गेले असता सोबतचे ईतर 2 ते 3 आरोपीतांनी फिर्यादीला पकडुन ठेवले होते.

.            सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 302, 143, 146, 147, 148, 149, 341 भादंवि. सहकलम 4(25) आर्म ॲक्ट अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पो.उप.नि. जावेद शेख 9403692766 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर  जिल्हा (ग्रामीण), नागपूर